महाराष्ट्र शासन

क्रमांक :-ससेभ २०१२/प्र.क्र.१९७/कोषा.प्रशा-२,
वित्त विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-१६ जुलै, २०१३.

प्रति,

विषय :- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा लेखाधिकारी (गट ब-राजपत्रित) संवर्गातील पदांकरीता शिफारस केलेल्या उमेदवारांना पदस्थापना देण्याबाबत.

संदर्भ :- वित्त विभाग, आदेश क्र ससेभ-२०१२/ प्र क्र १९७/ कोषा प्रशा-२. दि. १९/३/२०१३

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, राज्यसेवा मुख्य परीक्षा-२०११ च्या अंतिम निकालाच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नामनिर्देशन कोट्यातील रिक्त पदे भरण्याकरीता शिफारस केल्याने आपणास महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा लेखाधिकारी (गट ब-राजपत्रित) संवर्गातील पदावर नियुक्तीकरीता नियुक्तपूर्व प्रशिक्षणास रुजू करुन घेण्यात आले आहे.आपले नियुक्तपूर्व प्रशिक्षण दि.३१/८/२०१३ रोजी संपुष्टात येत असून आपणास नियमित पदावर पदस्थापना देण्यात येणार आहे. त्यानुसार लेखाधिकारी (गट ब -राजपत्रित) संवर्गातील पदस्थापने संदर्भात शासन अधिसुचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :- एसआरव्ही- २०१०/ प्र.क्र.१/ १०/ १२, दिनांक ८ जून,२०१० व शासन परिपत्रक, क्रमांक :- एसआरव्ही-२०१०/ प्र.क्र.१/ १०/ १२, दिनांक २१ जून, २०१० नुसार आपला प्रथम पसंती क्रम विहित नमुन्यात शासनास **७ दिवसांत कळवावा**. सदर शासन निर्णय व परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharastra.gov.in या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध आहेत. (संगणक सांकेतांक क्रमांक २०१००६११२०१३२१००१/ २०१००६११९२३९००१) आपला प्रथम पसंतीक्रम ७ दिवसात विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा लेखाधिकारी (गट ब - राजपत्रित) संवर्गातील रिक्त पदांची विभागनिहाय स्थिती पुढीलप्रमाणे आहे :-

१) कोकण - ४८
२) पुणे - ०७
३) नाशिक - १४
४) औरंगाबाद- २६
५) अमरावती- २८
६) नागपूर- ४१

(माधव आव्हाड)
कक्ष अधिकारी, वित्त विभाग

Sushama/Letter 11Cr29726